तंत्रज्ञान अधिविभाग.
दि. १४.१०.२०२४

# ''भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनाबाबत''
# विदयार्थ्यांना महत्वाची नोटीस २०२४–२५
# (फक्त एस्.सी प्रवर्ग प्रवेशीत विदयार्थ्यांच्याकरिता)

तंत्रज्ञान अधिविभागातील बी. टेक. भाग प्रथम, द्वितीय, थेट द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्ष तसेच एम्. टेक. भाग १,२ मधील सन २०२४–२५ प्रवेशित विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, ज्या अनुसुचित जाती, नवबौंध्द प्रवर्गातील तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही व उच्च शिक्षणासाठी आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे अशा विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय व विशेष साहय विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना'' सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेचे निकष, अटी व शर्ती सोबत प्रत जोडण्यात आलेली आहे.

तेव्हा, ज्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांनी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज दिनांक ३१.१०.२०२४ पर्यंत २ प्रतीमध्ये (१ मुळ व १ झेरॉक्स् प्रत) तंत्रज्ञान अधिविभाग कार्यालयामध्ये जमा करावा. सोबत अर्जाचा नमुना व आवश्यक असणारी कागदपत्रे व कागदपत्राची यादी जोडलेली आहे.

दिनांक ३१.१०.२०२४ नंतरचे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच सदरचा अर्ज भरण्याबाबत कोणत्याही विदयार्थ्यांस स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

Gaikwad 14/10/24
प्रशासकीय अधिकारी

- स्वाधार योजना अर्ज परिपूर्ण भरलेला,
- अर्जदाराचा जातीचा दाखला,
- महाराष्ट्र रहिवासी असल्याचा पुरावा,
- मागील वर्षाचा उत्पन्न दाखला
- विद्यार्थिनी विवाहित असल्यास पतीचा उत्पन्न दाखला,
- आधार कार्ड ची सत्यप्रत,
- दिव्यांग विद्यार्थी असल्यास प्रमाणपत्र,
- दहावी, बारावी किंवा पदवी गुणपत्रक जे लागु असेल,
- बोनाफाईड महाविद्यालय कडून घ्यावे,
- स्थानिक रहिवाशी नसल्याचे प्रमाणपत्र,
- महाविद्यालय उपस्थिति प्रमाणपत्र,
- विद्यार्थी शासकीय वस्तिगृहात प्रवेशित नसल्याचे शपतपत्र,
- विद्यार्थी जेथे राहतो त्याचा पुरावा,
- बैंक पासबुक ची सत्यप्रत,
- R.T.G.S. प्रमाणपत्राचा नमुना,
- आधार व बैंक खाते नंबर लिंक केल्याचा पुरावा.

- विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न 2,50,000 पेक्षा जास्त नसावे.
- विद्यार्थी महाराष्ट्र राज्यात असणे आवश्यक आहे.
- जातीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.
- विद्यार्थी त्यांच्या महाविद्यालय स्थानी किंवा महाविद्यालय शहर.गांव मध्ये स्थायिक नसावा/
- उमेदवार अनुसूचित जाती किंवा नवबोध असणे आवश्यक आहे.
- विद्यार्थी हा इ.11वी, 12वी आणि त्यानांतरचे दोन वर्षापेक्षा कमी कालावधी नसलेल्या अभ्यासक्रमासाठी उच्च शिक्षण घेणारा असावा.
- अपूर्ण अर्ज आणि आवश्यक कागदपत्रे नसलेले फॉर्म नाकारले जातील.
- 50% पेक्षा कमी गुण असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाहीअपंग . विद्यार्थ्यांसाठी ही मर्यादा40% असेल.
- अर्ज करणारा विद्यार्थी हा शासन मान्यता प्राप्त महाविद्यालय मधून प्रवेशित असावा.